## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) विद्यापीठाने एम.के.सी.एल. सोबत सामंजस्य करार केलेला असून त्याअंतर्गत विशारद स्कील डेव्हलपमेंट माध्यमातून महाविद्यालये व विद्यापीठ प्रशाळांमधील विद्यार्थ्यांना क्लिक कोर्सेस उपलब्ध करून दिले जाणार आहेत यातील सर्व कोर्सेससाठी आकारल्या जाणाऱ्या एकूण शुल्कातील विद्यापीठाला मिळणाऱ्या शुल्कापैकी ५० टक्के शुल्काला 'कुलगुरू कौशल्य विकास शिष्यवृत्ती' म्हणून सूट देण्याचा विद्यार्थी हिताचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे.

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि. २३ ऑगस्ट रोजी व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. या बैठकीत विविध विषयांना मान्यता देण्यात आली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत एम.के.सी.एल. सोबत विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे ६० तासांचे २ क्रेडीट असलेले आणि १२० तासांचे ४ क्रेडीट असलेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. एकूण ६७ कोर्सेस यामध्ये उपलब्ध आहेत. त्यामध्ये अकाऊंटींग करीअर, बँक ऑफिस करीअर, डिझायनिंग, डिझीटल आर्टस, डिजीटल फ्री लान्स तसेच हार्डवेअर व नेटवर्क मॅनेजमेंट, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आदी रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा समावेश आहे. यातील काही कोर्सेसचे शुल्क रू. ५००० आहे. तर काहींचे रू. २५०० शुल्क आहे. या शुल्कापैकी एम.के.सी.एल.ला दिले जाणारे शुल्क वगळता विद्यापीठाला प्राप्त होणाऱ्या शुल्कातून हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना 'कुलगुरू कौशल्य विकास शिष्यवृत्ती' म्हणून ५० टक्के शुल्क सुट देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेतला.

विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी व मार्गदर्शन प्राप्त व्हावे यासाठी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने 'कवयित्री बहिणाबाई चौधरी स्पर्धा परीक्षा फाऊंडेशन कोर्स' हा ऑनलाईन मोडमध्ये सुरु करण्याच्या महत्वाच्या निर्णयाला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

विद्यापीठाने लोकसहभागातून जळगाव, धुळे व नंदुबार या तिनही जिल्ह्यात ७५ महत्वाकांक्षी मियावाकी घनवनांची निर्मिती टप्प्याटप्प्याने करण्याचा निर्णय घेतला आहे. व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी विद्यापीठाने मियावाकी वनसंवर्धन प्रकल्प राबवावा यासाठी पत्र दिले होते आणि ही योजना राबविण्याचा मसुदा देखील दिला होता. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्यसाधून लोकसहभागातून ७५ मियावाकी घनवनांची निर्मिती येत्या काही वर्षात करावी यावर बैठकीत चर्चा झाली. महाविद्यालय स्तरावर निसर्ग संवर्धन मंडळ तयार केले जावे. रा.से.यो.चे स्वयंसेवक आणि या मंडळाचे सदस्य वनांच्या निर्मितीसाठी पुढाकार घेतील. यामध्ये स्थानिक गावकरी, वनविभाग, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, लोकप्रतिनिधी, इतर सामाजिक संस्था यांच्या मदतीने हा प्रकल्प साकारण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न राहील. त्यासंदर्भात नियमावली करण्यासाठी या बैठकीत समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

विद्यापीठातील मानसशास्त्र विभागाच्या वतीने विद्यापीठ प्रशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी या शैक्षणिक वर्षापासून मनकौशल्य ही नवी योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेत संभाषण कौशल्य, नेतृत्व कौशल्य, सामाजिक प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन, व्यक्तीमत्व विकास, ताण आणि वेळेचे व्यवस्थापन, विवाहपूर्व समुपदेशन आदीवर मार्गदर्शन केले जाणार आहे. विद्यापीठात एम.ए. नाट्यशास्त्र हा अभ्यासक्रम सुरु होत असून त्याच्या नियमावली व प्रवेश शुल्काला मान्यता देण्यात आली.

विद्यापीठातील विविध प्रशासकीय व शैक्षणिक विभागांच्या संरचनेत व कार्यपध्दतीत बदल करण्याबाबत प्रा. पी.पी. माहुलीकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालाला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठ स्तरावर लोकपाल नियुक्त करण्याच्या सुचना दिल्या असून त्या अनुषंगाने लोकपाल नियुक्तीच्या प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदेने तत्वत: मान्यता दिली. या बैठकीस प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे,

## जनसंपर्क विभाग

राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. एस.टी. भुकन, प्राचार्य संजय सुराणा, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, श्री. नंदकुमार बेंडाळे, भरत गावित, अॅड अमोल पाटील, नितीन झाल्टे, प्रा. महेंद्र रघुवंशी, डॉ. पवित्रा पाटील, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. विनोद पाटील, सीए रवींद्र पाटील, प्रा. योगेश पाटील हे उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांसाठी क्विक हेल फाऊंडेशनच्या वतीने गुरुवार दि. २४ ऑगस्ट रोजी सायबर सुरक्षा व जागरूकता या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. बी.व्ही. पवार यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. क्विक हेल फाऊंडेशनच्या वरीष्ठ कार्यकारी सुगंधा दाणी, जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयातील सायबर सुरक्षेचे अधिकारी सचिन सोनवणे, अरविंद वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जवळपास २०० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत भाग घेतला . प्रा. बी.व्ही. पवार यांनी सभाधिटपणा व संवाद कौशल्य, सचिन सोनवणे यांनी क्यू.आर. कोड, ऑनलाईन मार्केट या विषयावर तर अरविंद वानखेडे यांनी सायबर डाटा, फसविणाऱ्या साईट आदी बद्दल माहिती दिली. सुगंधा दाणी यांनी विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षितेतेबाबत प्रशिक्षण घेवून मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. समन्वयक डॉ. राजु आमले यांनी प्रास्ताविक केले. आशीष पाटील यांनी आभार मानले

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २४ ऑगस्ट , २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी